सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

## राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा रुग्णालय आवार,
गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५
Website: - www.jeevandayee.gov.in

# प्रस्तावना

दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील (वार्षिक रु.१ लाख व त्यापेक्षा कमी उत्पन्न असणारे) कुटुंबांना **महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेव्दारे** विमा संरक्षणाच्या माध्यमातून दर्जेदार व गुणवत्तापुर्ण वैद्यकीय उपचार नि:शुल्क पुरविण्यात येत आहेत.

या योजनेंतर्गत असणाऱ्या पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपुर्णा योजना, केशरी (वार्षिक रु.१ लक्ष वा त्यापेक्षा कमी उत्पन्न असणारे) या मुळ लाभार्थी घटकांबरोबरच औरंगाबाद व अमरावती विभागातील औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर, उस्मानाबाद, अमरावती, अकोला, बुलढाणा,वाशिम, यवतमाळ आणि नागपूर विभागातील वर्धा अशा एकूण १४ अवर्षणग्रस्त जिल्हयांतील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबांना देखील या योजनेत दि.६ जून,२०१६ पासून समाविष्ट करण्यात आले तसेच दि.६ डिसेंबर,२०१८ पासून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जिवित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबांना देखील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना राज्यात सुरु झाल्यापासून या योजनेंतर्गत २४ लाखाहून अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाने सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेतील लाभार्थ्यांसाठी '**आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना**' राज्यात दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून लागू केली आहे. ही योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी सांगड घालून राज्यात राबविण्यात येत आहे. या दोन्ही योजनांव्दारे राज्यातील किमान ९० टक्के जनतेला आरोग्य विम्याच्या संरक्षणाखाली आणून त्यांचे जीवनमान उंचावण्यात येत आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांचा सर्व सामान्य नागरिकांना माहिती प्राप्त व्हावी याकरिता राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे. ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांसाठी नेहमीच खुली असेल आणि सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा विचार करुन या सनदेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येतील. राज्य आरोग्य हमी सोसायटी नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास नेहमी कटीबध्द आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा राज्यातील अधिकाधिक नागरिकांना लाभ घेण्याचे याव्दारे आवाहन करण्यात येत आहे. या योजनांमधून लाभार्थी रुग्णांना वैद्यकीय उपचार/शस्त्रक्रिया उपलब्ध करण्याकरिता या योजनेचे सर्व अधिकारी/कर्मचारी कर्तव्य भावनेने व कर्तव्य तत्परतेने सतत प्रयत्नशील राहतील याची मी हमी देत आहे.

डॉ. सुधाकर शिंदे
मुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी

# राज्य आरोग्य हमी सोसायटी

शासन निर्णय क्र.मफुयो-२०१६/प्र.क्र.३३१/आरोग्य-६, दि.१२ ऑगस्ट,२०१६ अन्वये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना विमा कंपनीच्या सहभागाने राबविण्यासाठी तसेच वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशानुसार इतर महत्त्वाच्या वैद्यकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट,१८६० (१६८० चा अधिनियम क्र.२१) च्या तरतुदीनुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' स्थापन करण्यास व सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पंजीबध्द करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्देशानुसार, 'राज्य आरोग्य हमी सोसायटी' पंजीबध्द करण्यात आली आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज तसेच अधिपत्याखालील योजनांचे नियंत्रण व नियमन मुख्य कार्यकारी अधिकारी पाहतात. मुख्य कार्यकारी अधिकारी हे अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांना सहाय्य करण्याकरिता मुख्यालय स्तरावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्तीय सल्लागार व सहाय्यक संचालक (आरोग्य सेवा) हे प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी तसेच अन्य कंत्राटी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा स्तरावर जिल्हा समन्वयक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# नियामक परिषद

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून लागू करण्यात आली. त्यानुसार प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांकरिता शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२१ सप्टेंबर,२०१८ अन्वये खालीलप्रमाणे नियामक परिषद गठीत करण्यात आली आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | उपाध्यक्ष |
| ३ | सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४ | सचिव, ग्रामीण विकास विभाग | सदस्य |
| ५ | सचिव, नगरविकास विभाग | सदस्य |
| ६ | सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| ७ | सचिव,कामगार विभाग | सदस्य |
| ८ | आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक | सदस्य |
| ९ | मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी | सदस्य सचिव |

| | | |
|---|---|---|
| १० | संचालक, आरोग्य सेवा संचालनालय | सदस्य |
| ११ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय | सदस्य |
| १२ | राष्ट्रीय आरोग्य अभिकरणाचे प्रतिनिधी | सदस्य |

शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२६ फेब्रुवारी,२०१९ मधील निर्देशानुसार, उपरोक्त गठीत नियामक परिषदेच्या वर्षात किमान दोन बैठका आयोजित करावयाच्या आहेत.

# महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना – सर्वसाधारण माहिती

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना विमा तत्वावर राबविण्यात येत आहे तर सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/आरोग्य-६, दि.२१ सप्टेंबर,२०१८ अन्वये प्रधानमंत्री जन आरोग्य योजना Insurance व Assurance तत्त्वावर राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेची सर्वसाधारण वैशिष्टये व माहिती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बाब | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | प्रधानमंत्री जन आरोग्य योजना |
|---|---|---|---|
| १ | योजनेची सुरुवात/टप्पे | पहिला टप्पा - दि.२ जुलै,२०१२ पासून आठ जिल्हयांत लागू (मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, धुळे, नांदेड, अमरावती, सोलापूर,गडचिरोली) योजना लागू.<br>दुसरा टप्पा - दि. २१ नोव्हेंबर,२०१३ – उर्वरीत सर्व जिल्हयांत योजना लागू. | पहिला टप्पा- दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून ८३ शासकीय रुग्णालयांत.<br>दुसरा टप्पा – शासन निर्णय दि.५ मार्च,२०१९ नुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या खाजगी रुग्णालयांत राबविण्यात येत आहे. |
| २ | लाभार्थी घटक | पिवळी, अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबे आणि दारिद्रयरेषेवरील (रु.१ लक्षापर्यत वार्षिक उत्पन्न असलेल्या) केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबे व अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र | ग्रामीण भागातील एका खोलीत कच्च्या घरात राहणारी, प्रौढ व्यक्ती नसलेली, स्त्री कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे, दिव्यांग कुटुंब प्रमुख असलेली, अनुसूचित जाती व जमाती मधील, भूमिहीन मजूराच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंब तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदणी जिवित बांधकाम कामगार कुटुंब | कुटुंबांचा समावेश आहे. त्यात काही स्वाभाविक निकष असून त्यात घर नसलेली कुटुंबे, भिक्षुक, स्वच्छता कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, कचरा वेचक कुटुंबांचा समावेश आहे.<br>शहरी भागातील कचरा वेचक, भिक्षुक, घरकाम करणारे, गटई कामगार, फेरीवाले, बांधकाम कामगार, प्लंबर, गवंडी, रंगकाम करणारे, वेल्डर, सफाई कर्मचारी, माळीकाम करणारे, कारागीर, हस्तकला कारागीर, शिंपी, वाहतूक कर्मचारी, चालक, वाहक, मदतनीस, सायकल रिक्षा ओढणारे, दुकानात काम करणारे, सहाय्यक, शिपाई, अटेण्डट, वेटर, वीजतंत्री, मेकानिक, असेम्ब्ली / दुरुस्ती करणाऱ्या कुटुंबांचा समावेश आहे. |
| ३ | वार्षिक विमा संरक्षण व वैद्यकीय सेवा | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष/ प्रति कुटुंब रु.१.५० लक्ष एवढया मर्यादेपर्यत मोफत उपचार अनुज्ञेय असून मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी सदर मर्यादा रु.२.५० लक्ष एवढी आहे. | प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष/ प्रति कुटुंब रु.५ लक्ष इतकी आहे. रु.१.५ लक्षापर्यंतचे विमा संरक्षण विद्यमान विमा कंपनीकडून तर रु.१.५ लक्षावरील व रु.५ लक्षापर्यंतचे विमा संरक्षण ॲश्युरन्स पध्दतीने राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून देण्यात येत आहे. |
| ४ | वैद्यकीय उपचारांची संख्या | **वैद्यकीय उपचार** - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांना ९७१ उपचारांचा लाभ मिळत आहे. लाभार्थी जर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनेत समाविष्ट असेल तर त्यास १३०० (९७१+३२९)उपचारांचा | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | लाभ मिळत आहे. लाभार्थी जर फक्त प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील असेल तर त्यास १३०० उपचारांचा लाभ मिळत आहे.<br>**पाठपुरावा सेवा** - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ९७१ उपचारांपैकी १२१ उपचारांकरिता पाठपुरावा सेवा देण्यात येत आहेत.<br>**राखीव उपचार** - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनेंतर्गत ४६० उपचार शासकीय रुग्णालयांकरिता राखीव ठेवण्यात आले आहेत. | |
| ५ | खर्चाचे प्रमाण/शासन अनुदान | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसाठी राज्य शासनाचे १०० टक्के अनुदान प्राप्त होत आहे. | प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी होणाऱ्या खर्चापैकी ६० टक्के अनुदान केंद्र शासन देत आहे तर ४० अनुदान राज्य शासनाकडून प्राप्त होत आहे. |
| ६ | नि:शुल्क सुविधा | अंगीकृत रुग्णालयांतील उपचार, निदान, आवश्यक औषधोपचार, वैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टर यांचे शुल्क, बाहय रुग्ण विभागातील शुल्क, शुश्रुषा व भोजन तसेच अंगीकृत रुग्णालय ते रुग्णाच्या घरापर्यंतचा परतीचा प्रवास खर्च (रेल्वे अथवा बस) इ. सुविधा पुरविण्यात येतात. या योजनेंतर्गत रुग्णास सुट्टी झाल्यानंतर १० दिवसांपर्यंतची औषधे अंगीकृत रुग्णालयांतून मोफत देण्यात येतात तसेच उपचारादरम्यान काही गुंतागुंत निर्माण झाल्यास त्यावर देखील मोफत उपचार करण्यात येतात. | |
| ७ | लाभाची अनुज्ञेयता | लाभार्थ्यास वैध शिधापत्रिका (पिवळी, अंत्योदय, अन्नपूर्णा व केशरी) व शासनमान्य फोटो ओळखपत्राच्या आधारे, अवर्षणग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबास सदर शिधापत्रिका किंवा ७/१२ उतारा व शासन मान्य फोटो ओळखपत्र, बांधकाम कामगार असल्यास कामगार मंडळाने दिलेले ओळखपत्र व शासनमान्य फोटो ओळखपत्राच्या आधारे अंगीकृत रुग्णालयांमधून उपचार अनुज्ञेय आहेत. | सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत नोंद झालेल्या लाभार्थ्यांना संगणकीकृत ई-कार्डस व फोटो ओळखपत्राच्या सहाय्याने या योजनेचा लाभ मिळत आहे. |
| ८ | दावे अदा करण्याची कार्यपध्दती | प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांमध्ये समान असणाऱ्या उपचारांचे दावे विमा कंपनीमार्फत अंगीकृत रुग्णालयांना प्रदान करण्यात येत आहेत तर | |

| | | |
|---|---|---|
| | | केवळ प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट असणाऱ्या उपचारांचे अंगीकृत रुग्णालयांचे दावे राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून ॲश्युरन्स तत्त्वावर प्रदान करण्यात येत आहेत. |

- **अंगीकृत रुग्णालये** - महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ४९३ अंगीकृत रुग्णालयांमार्फत लाभार्थ्यांना वैद्यकीय उपचार पुरविण्यात येत आहेत. यामध्ये ८१ शासकीय व ४१२ खाजगी रुग्णालयांचा समावेश आहे. जिल्हानिहाय अंगीकृत रुग्णालये, वैद्यकीय सेवांनिहाय अंगीकृत रुग्णालये इ. संदर्भाने आवश्यक अधिक माहिती www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळावर Network Hospitals येथे उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे रुग्णालय अंगीकरणाकरिता Hospitals>Hospital Empanelment Request येथे भेट दयावी.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दि.२३ सप्टेंबर,२०१८ पासून पहिल्या टप्प्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या राज्यातील ८१ शासकीय रुग्णांलयामध्ये राबविण्यात येत आहे. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या खाजगी रुग्णालयांमध्ये देखील प्रधानमंत्री जन आरोग्य योजना सुरु करण्यास दि.५ मार्च,२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

- विद्यमान योजनांची व्याप्ती विस्तारुन सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना एकमेंकाशी संलग्नीकरण करुन Insurance व Assurance mode व्दारे संयुक्त पध्दतीने राबविण्यास दि.१५ जानेवारी,२०१९ रोजीच्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार दि.२६ फेब्रुवारी,२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सुधारीत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना संयुक्त पध्दतीने राबविण्याकरिता विमा कंपनीची ई-निविदा पध्दतीने नव्याने निवड करण्यात येणार आहे. त्यानुसार निविदा प्रपत्र अंतिम करण्यासंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत नोंद झालेल्या लाभार्थ्यांना संगणकीकृत ई-कार्डस वितरीत करण्यात येत आहे. या ई-कार्डसच्या सहाय्याने या योजनेतील लाभार्थ्यांना अंगीकृत शासकीय रुग्णालयांत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळत आहे. वैध शिधापत्रिका व ई-कार्डस धारक लाभार्थी असल्यास त्यास महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमधून उपचार देण्यात येत आहेत व ज्या लाभार्थ्यांकडे केवळ वैध शिधापत्रिका असेल त्यांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

# योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व कालमर्यादा

| अ.क्र. | सेवा | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | रुग्णांची नावनोंदणी | २४ तास |
| २ | उपचार/शस्त्रक्रियेस पुर्वमान्यता | २४ तास |
| ३ | आत्पकालीन दुरध्वनी सेवा | तात्काळ |
| ४ | अंगीकृत रुग्णालयास दावे अदा करणे (परिपुर्ण कागदपत्रांसह) | १५ कार्यालयीन कामकाजाचे दिवस |

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेविषयी माहिती घेण्यासाठी तसेच योजनेंतर्गत मिळणाऱ्या सेवांबाबत तक्रार करण्याकरिता कॉल सेंटरची सुविधा उपलब्ध आहे. उपरोक्त सेवा/सुविधा मिळण्यास कोणतीही अडचण/विलंब झाल्यास, १५५ ३८८ अथवा १८०० २३३ २२०० या नि:शुल्क (टोल फ्री) दुरध्वनी क्रमांकावर तक्रार दाखल करता येईल किंवा लेखी तक्रारी अर्ज या कार्यालयास पाठविता येईल. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १४५५५ व १८०० १११ ५६५ या नि:शुल्क (टोल फ्री) दुरध्वनी क्रमांकावर योजनेविषयी अधिक माहिती प्राप्त करता येईल अथवा तक्रार दाखल करता येईल.

# सहयोगी विमा कंपनी व तृतीय पक्ष प्रशासक कंपन्या

विद्यमान महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांना सार्वजनिक क्षेत्रातील नॅशनल इन्श्युरन्स कंपनी या विमा कंपनीमार्फत विमा संरक्षण पुरविण्यात येत आहे. सदर विमा कंपनीकडून राज्य व जिल्हा स्तरावर योजनेचे कामकाज करण्यासाठी भारतीय विमा नियामक प्राधिकरणाकडील मान्यता प्राप्त तृतीय पक्ष प्रशासक कंपन्यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तृतीय पक्ष प्रशासक कंपनी | अंतर्गत येणारे जिल्हे | एकूण जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | मे. एमडी इंडीया हेल्थ इन्श्युरन्स टिपीए लिमिटेड | गडचिरोली, अमरावती, नांदेड, सोलापूर, धुळे, रायगड, मुंबई शहर, मुंबई उपनगर, औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, परभणी, पुणे, सातारा, सांगली, नागपूर | २० |
| २ | मे. मेडी असिस्ट इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि. | अकोला,बुलढाणा,अहमदनगर,जळगाव, नंदुरबार, नाशिक, वाशिम, यवतमाळ | ८ |
| ३ | मे. पॅरामाऊंट हेल्थ सर्व्हीसेस अॅन्ड इन्श्युरन्स टिपीए प्रा.लि. | भंडारा,चंद्रपुर, गोंदिया, पालघर, ठाणे, रत्नागिरी,सिंधुदुर्ग, वर्धा | ८ |

# सोसायटी मुख्यालयातील कामकाज

राज्य आरोग्य हमी सोसायटी अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे संनियत्रण होण्यासाठी दैनंदिन कामकाज करण्यासाठी खालीलप्रमाणे शाखा कार्यान्वित आहेत.

| अ.क्र. | शाखेचे नाव | अ.क्र. | शाखेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | आस्थापना | १० | दावे (क्लेम्स) |
| २ | प्रशासन | ११ | तक्रार निवारण |
| ३ | लेखा | १२ | ग्राहक सेवा, कॉल सेंटर व सीएम फीडबॅक |
| ४ | रुग्णालय अंगीकरण | १३ | माहिती तंत्रज्ञान |
| ५ | आरोग्य पत्र | १४ | रुग्णालय वैद्यकीय परिक्षण (मेडीकल ऑडीट) |
| ६ | माहिती, शिक्षण व संवाद | १५ | क्लिनीकल प्रोटोकॉल |
| ७ | क्षेत्रीय कार्यान्वयन | १६ | सांख्यिकी |
| ८ | उपचारपूर्व मान्यता (प्रि-ऑथोरायझेशन) | १७ | धर्मादाय रुग्णालये |
| ९ | आरोग्य शिबीर | १८ | माहिती अधिकार |

# क्षेत्रीय कार्यान्वयन

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचे क्षेत्रीय स्तरावर संनियत्रण होण्यासाठी प्रत्येक महसुल विभागात क्षेत्रीय व्यवस्थापक व प्रत्येयक जिल्हयात जिल्हा समन्वयक ही पदे कार्यरत आहेत. जिल्हा समन्वयक हे जिल्हयांतील अंगीकृत रुग्णालयांना नियमित भेटी देणे, जिल्हा प्रशासनाशी समन्वयक साधणे, योजनेंतर्गत कार्यरत समित्यांच्या बैठकांचे आयोजन करणे, लोकप्रतिनिधींशी समन्वयन साधणे, आरोग्य शिबीराचे आयोजन इ. संदर्भात महत्त्वपुर्ण भुमिका पार पडत आहेत. सदर जिल्हा समन्वयकांच्या कामकाजावर क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापकांमार्फत व मुख्यालय स्तरावर वरिष्ठ व्यवस्थापक (ऑपरेशन्स) आणि महाव्यवयस्थापक (ऑपरेशन्स) यांचेव्दारे देखरेख व नियंत्रण ठेवण्यात येते. सध्या कार्यरत क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा समन्वयक यांच्या संपर्कासंदर्भातील तपशील www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळावर staff directory मध्ये उपलब्ध आहे.

-------------------------------